२९/१२/०९.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क.म.वि./म.वि./१८४ (A) दिनांक:– २५.०९.२००९.

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
गुरुनानक एज्युकेशनल सोसायटी, नागपूर
व्दारा– गुरुनानक इंस्टिटयुट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी,
दहेगांव, कळमेश्वर रोड, नागपूर

विषय :–सत्र २००९–१० पासुन नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडयांना प्रथम संलग्निकरण प्रदान करण्याबाबत.

संदर्भ :– शासन निर्णय क्र. टिईएम २००९/(१०३/०९)/तांशि–४, दिनांक १५ जुन, २००९.

महोदय,

आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भांकित पत्रानूसार राज्य शासनाने आपल्या संस्थेला सत्र २००९–१० पासुन नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडयांना सुरु करण्यास दिलेल्या परवानगीनुसार व स्थानिय चौकशी समितीने केलेल्या शिफारशीनुसार व त्यास विद्यापीठाच्या विव्दत परिषदेने दिनांक २४.०९.२००९ ला दिलेल्या मंजुरी नुसार म. वि. अधिनियम १९९४ च्या कलम ८३ अंतर्गत नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडयांना सत्र २००९–१० पासून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन राहून प्रदान करण्यात येत आहे.

| महाविद्यालयाचे नांव | विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडया | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| गुरुनानक इंस्टिटयुट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, दहेगांव, कळमेश्वर रोड, नागपूर | १) कॉम्प्युटर सायंस ॲण्ड इंजिनिअरींग | ६० वरुन ९० |
| | २) इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग | ६० |
| | ३) एम.बी.ए. | ६० |

**प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन प्रदान करण्यात येत आहे**

१. उपरोक्त नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडयांना देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण विद्यापीठाद्वारे गठीत स्थानिय चौकशी समितीने महाविद्यालयास भेट देऊन सादर केलेल्या अहवालात दर्शविलेल्या त्रृटी विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या अटीवर देण्यात येत आहे. (समितीच्या अहवालाची प्रत सोबत जोडलेली आहे.)

२. विद्यार्थी संख्येचे निकष शासन निर्णय क्र. एनजीसी–१०९३ /(५९१८)/मशि–३, दिनांक १९ जुन, १९९५ प्रमाणे महाविद्यालयावर बंधनकारक राहतील त्याचे उलंघन झाल्यास शासन निर्णय दि. २१.०१.२००६ नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

३. विद्यापीठाने विहीत केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी अध्यापक वर्ग/ कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असुन इतर सर्व आवश्यक पायाभुत सोयी उपलब्ध करुन त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करुन विद्यापीठास तसे प्रमाणपत्र देण्याच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

४. उपरोक्त अभ्यासक्रमाची परवानगी प्राचार्य व नियमित शिक्षक भरण्याच्या अटीवर देण्यात येत आहे. प्राचार्य व नियमित शिक्षकांची नियुक्ती न केल्यास विद्यार्थ्यांना दिलेले प्रवेश रद्द होतील.

५. नवीन व्यावसायिक नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडया मंजुर करण्यात आलेल्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २००९–१० व २०१०–११ मध्ये नॅक ॲक्रेडिएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळाल्यास विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडयांची मान्यता आपोआप रद्द होईल या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

६. उपरोक्त नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडया कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास आपले महाविद्यालय तयार असून त्या आशयाचे हमीपत्र महाविद्यालयाने विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर यांना सादर करण्याचे अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे.

७. नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडयांना प्रथम संलग्निकरण प्रदान केल्यानंतर अध्यापनाचे १८० दिवस महाविद्यालयाव्दारा पुर्ण करण्यात येतील अशा आशयाचे शपथपत्र रु. १०० /– च्या गैर न्यायिक मुद्रांकावर सादर करण्याचे अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे.

८. प्रथम संलग्निकरण प्राप्त झाल्यानंतर ज्या महाविद्यालयांनी वरील नमुद विविध अटी व शर्तीची पुर्तता केली नाही अशा महाविद्यालयांना पुढील निरंतर संलग्निकरण देता येणार नाही व जर अशा महाविद्यालयानी पुढील सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया केली तर प्रवेशित विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठ घेणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

९. ज्या अभ्यासक्रमाचे अभ्यासक्रमीका, अध्यादेश विद्यापीठात तयार नाही असे अभ्यासक्रम/ विषय महाविद्यालयांनी सुरु करु नये.

१०. कायम विना अनुदान तत्वावर संस्थेस/महाविद्यालय नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडयांना आर्थिकदृष्टया चालविणे शक्य व्हावे यासाठी संस्थेने/महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून विद्यापीठ/ शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या शुल्कानुसारच शुल्क आकारावे.

११. निरंतर संलग्निकरणाचे आवेदनपत्र दि. ३०.०९.२००९ पर्यंत सादर करण्यात यावे.

१२. महाविद्यालयाच्या बांधकामाचे मोजमाप करण्याकरीता अभियंता समिती महाविद्यालयाला भेट देऊन सादर केलेल्या अहवालाच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

१३. वरील सर्व अटींची पुर्तता तसेच पुढील निरंतर संलग्निकरणाकरीता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,/ राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/ बार कौन्सिल ऑफ इंडिया इत्यादी शिखर संस्थांनी घालुन दिलेल्या अटींची पुर्तता विहीत कालावधीत संस्थेने न केल्यास पुढील संलग्निकरण स्थगित होईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची/ संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

कृपया कळावे.

Despatch Section
G. N. I. T., Nagpur
965
22/12/09

Shital to show to hon. secretary.
please file
23/12/09

आपला

( फु. ख. भगत )
सहायक कुलसचिव (म.वि.)

प्रतिलिपी माहितीकरिता सादर:–

१. मा.संचालक उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे.
२. सहसंचालक, (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,नागपूर
३. मा.संचालक (म.वि.वि.म.)
४. मा.वित्त व लेखा अधिकारी
५. मा.परिक्षा नियंत्रक
६. उपकुलसचिव विद्या विभाग
७. सहायक कुलसचिव, परिक्षा विभाग,गोपनिय विभाग,व्यावसायिक परिक्षा,परिक्षा व चौकशी
८. संबंधित लिपीक, शिक्षक मान्यता
९. संबंधित लिपीक, संलग्निकरण शाखा

(क्र. ३ ते ९ : रा.तु.म.नागपूर विद्यापीठ,नागपूर.)

यांना विनंती करण्यांत येते की, त्यांनी आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी.

C:\AFFILIATION 09-10\NEW COURSE AFFILIATION.doc.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )
महाविद्यालयीन शाखा
छत्रपति शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१ दुरध्वनी क्रमांक २५२९९३२

क्र.म.वि. 1135
दिनांक:– 22/10/2009.

## प्रमाण–पत्र

प्रमाणित करण्यात येते की, **गुरू नानक इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, दहेगांव कळमेश्वर रोड,जि.नागपूर** हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी सत्र २००९–१० करिता तात्पुरते संलग्नित असुन संलग्निकरणाची पुढील प्रक्रिया सुरु आहे.

सदर **प्रमाण–पत्र** महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेअंतर्गत मिळावयाचे अनुदान आणि विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या प्रवास सवलती, शिष्यवृत्ती व इतर आर्थिक सवलती मिळण्याच्या दृष्टीने प्रदान करण्यात येत आहे.

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,नागपूर विद्यापीठ,नागपूर.

428
23/10/09
Signature

To
Sri Shital
for necessary action.
23/10/09

Hon. secretary for information.